
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg No. PNC-116. Licence No. 34

वर्ष ४० | पुणे, बुधवार, ४ आणि १८ सप्टेंबर १९७४ | अंक १७ आणि १८


महाराष्ट्र बँकेने बचत किफायतशीर व्हावी यासाठी आखलेल्या आकर्षक ठेव योजना.
१) मुदत ठेव योजना २) आवर्त ठेव योजना ३) संचित ठेव योजना
४) निश्चितकाल ठेव योजना ५) मासिक व्याज योजना ६) लोकमंगल ठेव योजना
७) बचत रूपी विमा योजना
याशिवाय नेहमीची चालू व बचत खाती आहेतच.
*अधिक तपशीलासाठी नजीकच्या शाखेशी अगर मुख्य कचेरीशी संपर्क साधा.*

**बँक ऑफ महाराष्ट्र** ११७७, बुधवार पेठ, पुणे-४११ ००२.

TOM & BAY/BM : 7435M

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र


## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

[illegible] विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: [illegible]

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ४ आणि १८ सप्टेंबर, १९७४


संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## उत्पादनक्षमतेपेक्षा उत्पादन एवढे कमी का होते ?
### सरकारचे वीजनिर्मिती आणि वाटप ह्यांच्याकडे दुर्लक्ष

चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारताची वीज-उत्पादन योजनेतील गुंतवणूक ४,९०० कोटी रुपये होती. पाचव्या योजनेच्या अखेर ती ११,१५० कोटी रुपयांवर जाईल. म्हणजे, रेल्वेजमधील एकूण गुंतवणुकीपेक्षाही ही गुंतवणूक जास्त आहे. ही गुंतवणूक कार्यक्षमतेने वापरून उद्योग-धंद्यांची यंत्रे फिरवत ठेवण्याची जबाबदारी मध्यवर्ती आणि राज्य सरकारांवर आहे. उद्योगधंद्यांना अत्यावश्यक, पायाभूत, अशा गोष्टींची उणीव दूर झाल्याखेरीज आर्थिक विकास कसा होणार ? “अडचणी तात्पुरत्या आहेत; अर्थव्यवस्थेचा पाया भक्कम आहे” असे आपले मंत्री वरचेवर वल्गना करतात, त्याला मुकुंद आयर्न अँड स्टील कंपनीचे चेअरमन श्री. विरेन जे. शहा ह्यांनी कंपनीच्या भागधारकांना केलेल्या निवेदनात मुद्देसूद रीतीने उत्तर दिले आहे.

कारखाने आणि शेती ह्यांना किती इंधन उपलब्ध आहे, ह्यावर देशाचा आर्थिक उत्कर्ष अवलंबून असतो. तेव्हा, इंधनाचा पुरवठा कमी पडला म्हणजे त्याचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. भारतात विजेच्या तुटवड्यामुळे उत्पादनास भयंकर खीळ बसली आहे. आपल्या प्रत्येक पंचवार्षिक योजनेत विजेच्या मागणीचा अंदाज करून वीजपुरवठ्याची लक्ष्ये स्पष्ट करण्यात आलेली होती, पण प्रत्येक योजनाकाळात गरजेपेक्षा वीज-पुरवठा कमी पडत आला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजना काळात हा तुटवडा १५·४% एवढा होता, तो चवथ्या योजना काळात ५०%वर गेला ! पाचव्या योजनाकारांनी त्याची कारणे दिली आहेत, पण ती सर्व मानवी प्रयत्नांनी दूर करण्याजोगी आहेत; अचानक आलेल्या आपत्ती नव्हेत.

राज्य वीज बोर्डे ह्यांच्यावर मुख्यत: विजेची निर्मिती आणि पुरवठा ह्यांची जबाबदारी आहे. परंतु सरकारी खात्याप्रमाणे त्यांचा खाक्या आहे, गिऱ्हाइकांच्या गरजा जाणून घेऊन त्या भागविण्याची जबाबदारी त्यांच्यावर नाही; गिऱ्हाइकांना त्यांना जाबही विचारता येत नाही. जोडलेल्या यंत्रशक्तीच्या प्रत्येक किलोवॅट मागे ३,००० युनिट्स एवढी वीज राज्य वीज बोर्डाची थर्मल स्टेशन्स निर्माण करतात; अमेरिकेत ते प्रमाण ४,७०० युनिट्स, जपानमध्ये ५,६०० युनिट्स आणि प्रत्यक्ष भारतात ट्रॉम्बेच्या टाटा पॉवर हाऊसमध्ये ६,८०० युनिट्स एवढे मोठे आहे.

तयार वीज गिऱ्हाइकापर्यंत पोचताना वाटेत काही वीज वाया जाते. वाया जाणाऱ्या विजेचे उत्पादित विजेशी प्रमाण औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांत ५·७ ते १२·५% एवढे पडते, तर भारतात ते १७% आहे. वाटेत १% वीज वाया गेली, तर त्यामुळे होणारे नुकसान वार्षिक ५ कोटी रुपयांच्या नुकसानीची बरोबरी करते. एवढ्याने भागत नाही; वीज-पुरवठ्यात वारंवार खंड पडतो आणि फ्रीक्वेन्सीमध्ये होणाऱ्या फेरफारामुळे यंत्रसामग्रीमध्ये बिघाड निर्माण होतो, ती लवकर खराब होते.

हैड्रो, थर्मल आणि न्युक्लिअर ह्या तीन प्रकारे वीज मिळू शकते. भारतात हैड्रो विजेवरच भर यायला हवा; पण हैड्रो विजेच्या शक्यतेच्या मानाने आपण फक्त १७% च वीज निर्माण करीत आहो. नर्मदा प्रकल्पाप्रमाणे कित्येक प्रकल्प निर्णयांना विलंब आणि राजकीय ओढाताण ह्यांमुळे मागे पडले आहेत. एकट्या नर्मदा प्रकल्पाच्या दिरंगाईमुळे गेल्या २६ वर्षांत भारताचे ९५० कोटी रु. नुकसान झालेले आहे. हैड्रो विजेची भरपूर शक्यता असणारी राज्येही विजेचा भयानक तुटवडा अनुभवत आहेत.

उत्पादनामधील आजच्या चिंताजनक घटीविषयी अर्थखात्याचा आढावा काय म्हणतो ते पाहा:— “वाढीची गती मंदावण्याचे सर्वांत महत्त्वाचे कारण विजेचा देशभर तुटवडा हे आहे.” पॉवर शॉर्टेजमुळे लोकांना उपलब्ध व्हावयाच्या पोलादात ४,१४,००० टनांची घट झाली. पोलाद कारखान्यांना त्यांच्या गरजेच्या मानाने ३५% वीज मिळाली; त्यांच्या उत्पादनक्षमतेच्या मानाने त्यांचे उत्पादन फक्त ३८·२% झाले. वीजपुरवठ्याच्या तुटवड्यामुळे कोळशाचे उत्पादनही घटले. शेतीचे उत्पादन वाढ-विण्यासाठी खतांची आवश्यकता आहे, परंतु पॉवर शॉर्टेजमुळे खतांच्या कारखान्यांचे उत्पादन घटून त्यामुळे सुमारे ७५ कोटी रु. किंमतीची आयात वाढली, ॲल्युमिनिअम केबल्स आणि कंडक्टर्स ह्यांची वीजनिर्मितीला आणि वीज वाहणाऱ्या तारांना आवश्यकता असते. १,९५,००० टनांची उत्पादनक्षमता असता, पॉवर शॉर्टेजमुळे फक्त १,५०,००० टनांचेच उत्पादन होऊ शकले. ॲल्युमिनिअमच्या बहुतेक कारखान्यांवर काही

काळ कारखाने बंद ठेवण्याची किंवा उत्पादन मंदावण्याची पाळी आली. आपण वास्तविक ॲल्युमिनिअम निर्गत करीत होतो; आता त्याच्या उत्पादनातील घटीवर उपाय म्हणून आयातीची भाषा सुरू झाली आहे. १९७२ च्या पहिल्या सहामाहीत सिमेंटचे उत्पादन १८ लक्ष टनांनी घटण्यास पॉवर शॉर्टेज हेच कारण आहे. कपास कापडाच्या गिरण्यांचे उत्पादन फेब्रुवारी १९७३ ते जून १९७३ या मुदतीमधील पॉवर कटमुळे ३५० किलोग्रॅम सूत आणि ७२० लक्ष मीटर कापड एवढ्यांनी कमी झाले; तागाची तीच रडकथा आहे.

वीज तुटवड्यासंबंधी सरकार आशादायक असे काहीच सांगू शकत नाही; उलट विजेवरील नियंत्रणांची आवश्यकताच प्रतिपादन केली जात आहे. भारतातील वीज-निर्मिती केंद्रे कार्यक्षमतेने चालविण्यात आली, तर वीज-उत्पादनक्षमतेच्या ९०% एवढी वीज आजही निर्माण करता येईल आणि वाटेत वीज वाया जाण्याचे प्रमाण १७% वरून ५·७% वर आणले तर विजेचा भासणारा तुटवडा बहुतांशी दूर होईल. हैड्रो-इलेक्ट्रिक प्रकल्पांच्या बाबतीत इंजिनिअरांच्या अंदाजावर राजकीय दडपण येत असावे, असे दिसते; हे प्रकल्प अधिक वस्तुनिष्ठ केले जावयास हवेत. तात्काळ स्वयंपूर्णता गाठण्याच्या नादात दीर्घकालीन योजनांकडे दुर्लक्ष होता कामा नये. कोळसा वाहतुकीच्या मार्गातील अडथळे दूर व्हायला हवेत. ज्या उद्योगांना मोठ्या प्रमाणावर वीज लागते, अशांना स्वतःची वीज निर्माण करण्यास प्रोत्साहन मिळणे जरूर आहे.

---

गेल्या वर्षीच्या मानाने चालू वर्षी ७२० कोटी रु.चा जादा बोजा

१९७३–७४ च्या मानाने १९७४–७५ मध्ये भारतीय करदात्यांना ७२० कोटी रु. जादा कर द्यावे लागणार आहेत. २८ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्र्यांनी २१२ कोटी रु. चे नवीन कर जाहीर केले. ३१ जुलै रोजी पुरवणी बजेटाने आणखी २३२ कोटी रु.चे कर बसविले. रेल्वेमंत्र्यांनी पहिल्या बजेटाच्या वेळी १३३ कोटी रु. ची दरवाढ केली आणि आता त्यांनी पुन्हा १४० कोटी रु. ची दरवाढ केली आहे. अशा रीतीने, ७२० कोटी रु. चा बोजा वाढला आहे. आर्थिक वर्ष संपायला अजून सात महिन्यांचा अवधी आहे आणि आणखी करवाढ व दरवाढ अशक्य नाही.

---


### इन्कमटॅक्सचे अग्रेसर थकबाकीदार

| (जून, १९७४ अखेरचे आकडे) | कोटी रुपये |
|---|---|
| १ इंडियन ऑइल कॉर्पोरेशन | ६·१८ |
| २ इब्राहिम अब्दुल लतिफ व इतर | २·९२ |
| ३ जयंती शिपिंग कॉर्पोरेशन | १·९५ |
| ४ बी. पी. पटेल | १·७८ |
| ५ चिरंजीलाल एस. गोएंका | १·७५ |
| ६ इस्सो ईस्टर्न इनकॉर्पोरेटेड | १·६८ |
| ७ लोकनाथ तोलाराम | १·४८ |
| ८ मोरारजी गोकुळदास स्पि. अँड वी. कं. | १·२० |
| ९ श्री चांगदेव शुगर मिल्स | १·१२ |
| १० एस्सो स्टँडर्ड रिफायनरीज कं. लि. | १·०२ |


★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

विजय पंपस् कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—


आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो,

त्यांस “विजय” पंपाची

आवश्यकता आहेच.



कारखानदार—
फोन : २३२
तार : Vijayplow

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

# तुमच्या कल्पना वरिष्ठांच्या गळी कशा उतरवाल?

### आर्थिक लाभ किंवा मानसन्मान मिळाला नाही, तरी मनःशांती खासच मिळेल

(सु. वि. मेहेंदळे, बी. ई.; एम. बी. ए.)

बहुसंख्य नोकरदार हे वरिष्ठांनी नेमून दिलेले काम आपापल्या कुवतीप्रमाणे किंवा इच्छेप्रमाणे आखून दिलेल्या मार्गाने उरकीत असतात. पण उद्योग-व्यवसायांच्या बदलत्या परिस्थितीत 'जुने ते सोने' म्हणून भागत नाही. काम जलद उरकण्यासाठी, कमी खर्चात पार पाडण्यासाठी नवे नवे मार्ग धुंडाळावे लागत आहेत, कामाच्या नव्या पद्धती अमलात आणाव्या लागत आहेत. या वेळी या नव्या पद्धतींचा विचार फक्त वरिष्ठांनीच करायचा म्हटले तर एक तर वरिष्ठांना वेळ पुरणार नाही किंवा त्यांचा कामाशी प्रत्यक्ष संबंध बेताचाच असल्याने कार्य-पद्धती सुधारणारे सोपे सोपे बदलही त्यांना सुचायला अवघड जाईल. शिवाय, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बुद्धीचा तल्लखपणा हा वयोमानामुळे, इतर व्यापामुळे किंवा निसर्गतःच बेताची बुद्धी असल्यास एखाद्या कनिष्ठापेक्षा कमीच असू शकेल. नव्या कल्पना सुचण्यासाठी अमूकच व्यक्ति किंवा अधिकारी लायक असेल असे म्हणता येणार नाही. भोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण, बुद्धीला चालना देण्याची शक्ती किंवा सवय, हे गुण प्रत्येकाचे बाबतीत निरनिराळे असू शकतील. झाडावरून पडणारे फळ न्यूटन या शास्त्रज्ञाचे अगोदरही कोट्यवधी लोकांनी पाहिले असेल. पण त्यावरून गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत फक्त न्यूटनलाच मांडता आला.

सारांश, नव्या कल्पना या कोणा व्यक्तीला सुचतील हे त्याच्या वयावरून, दर्जावरून ठरवता येणार नाही. तेव्हा तुम्ही जरी एखाद्या दुय्यम किंवा कनिष्ठ पदावर काम करीत असला तरी तुम्हांला सुचलेल्या कल्पनांचा पद्धतशीर पाठपुरावा करा. ती कल्पना अव्यवहार्य म्हणून टाकाऊ ठरेपर्यन्त तिच्यावर विचार करीत राहा. त्या कल्पनेचे व्यवहार्य पद्धतीत कसे रूपांतर करता येईल, या दृष्टीने उलट सुलट विचार करून चाचणी घेत राहा. केव्हाही कल्पना सुचताच वरिष्ठांकडे धाव घेऊन घाईघाईने आपली कल्पना त्यांच्यासमोर मांडू नका. या कल्पनेचा स्वीकार करण्यात काय अडथळे उभे केले जातील, ही कल्पना अमलात आणल्यास काय फायदे किंवा तोटे होतील, याचा नीट अंदाज घ्या व पूर्ण विचारांती ती कल्पना वरिष्ठांपुढे सादर करा. तुमच्या दृष्टीने वरिष्ठांनी स्वीकारण्याजोगी कल्पना असेल तर ती त्यांच्यापुढे मांडताना खाली दिलेल्या सूचनांचा विचार करा. या सूचना तुम्हांला या कामात खास मार्गदर्शक ठरतील.

१. बरोबरीच्या काही सहकाऱ्यांची मदत घ्या. बहुधा नवीन सूचना करणारा माणूस त्याला सुचलेल्या कल्पनेने भारलेला असतो. अशा वेळी ज्यांना ही कल्पना सुचली नाही पण जे त्या व्यक्तीचे हितचिंतक आहेत अशांपुढे प्रथम ती कल्पना मांडावी. ते त्यांच्या कुवतीप्रमाणे ही कल्पना पारखून घेतील, काही बदल सुचवतील. अशा सहकाऱ्यांच्या मदतीने जर नवी कल्पना वरिष्ठांपुढे मांडली तर ती त्यांचेवर अधिक प्रभाव पाडू शकेल. वरिष्ठांच्या मनात नसले तरी त्यांना त्या सूचनेकडे लक्ष द्यावे लागेल व अधिक विचारानंतर त्यांना ती व्यवहार्य आहे असे समजून येऊ शकेल. तुमचे सहकारी, तुम्हांला जर जमत नसेल तर, ही सूचना पद्धतशीरपणे मांडून तुमच्या वतीने वकिलीही करू शकतील.

२. कल्पना मांडताना योग्य मुहूर्त पाहात जा. ज्यांनी कल्पनेचा स्वीकार करायचा आहे त्या वरिष्ठांची सोयीची, गैर-सोयीची वेळ लक्षात घेणे आवश्यक आहे. उदा. वरिष्ठ अधिकारी जर काही घरगुती समारंभाची आखणी करण्यात व्यग्र असेल तर त्यांचेपुढे ऑफिसातील एखाद्या खर्चात थोडीशी काटकसर सुचविणारी योजना आल्यास त्यांना त्यावेळी त्यावर लक्ष देणेही अनावश्यक वाटेल. यासाठी कल्पना थोडक्यात लिहून जर वरिष्ठांकडे पाठविली आणि त्यांच्या सवडीने त्या विषयावर चर्चा करण्यास आमंत्रण मागून घेतले तर योग्य वेळी शांतपणे तुम्हांला त्या विषयावर सविस्तर बोलणे करून आपली कल्पना त्यांना पटवून देता येईल. जर त्यांनी योग्य वेळात बोलावले नाही तर त्यांना आपल्या कामाचे स्मरण देण्यास हरकत नाही.

३. कल्पना मांडताना ती शक्य तेवढी खुलासेवार व स्पष्ट मांडायला हवी.

तुम्हाला एखादी कल्पना सुचली व ती आवडली म्हणून तुमच्या वरिष्ठांना ती पसंत पडेलच असे नाही. त्या कल्पनेने तुम्ही जसे प्रभावित झाला असाल तसे इतरही होतीलच असे नाही. तेव्हा त्यांना नीट समजेल अशी खुलासेवार व पद्धतशीर मांडणी करूनच ती कल्पना मांडायला हवी. घरे सजवणाऱ्या डेकोरेटर्सना त्यांच्या डिझाईनचे स्केच गिऱ्हाईकांपुढे ठेवावे लागते तेव्हाच त्यांना कामासाठी मंजुरी मिळते. नुसते मी तुमचे घर आकर्षक सजवून देतो; मला १० हजार रुपये द्या; असे सांगून कंत्राट मिळत नाही.

४. फार वादावादीत पडू नका. तुमच्या कल्पनेवर त्याची योग्यायोग्यता ठरवून निर्णय देण्यापूर्वी तुमचे वरिष्ठ अनेक शंका प्रदर्शित करतील. प्रश्न उभे करतील. अशा वेळी तुमच्या विचार-शक्तीला पटले म्हणून तुमचीच कल्पना योग्य आहे याबद्दल आत्मविश्वास जरूर बाळगा. वरिष्ठांच्या शंकांचे योग्य ते निरसन करा. पण अती आग्रही भूमिका धरून त्यांच्याशी वाद उभा करू नका. एकदा वादात पडलात तर ते तुमची डाळ शिजू देणार नाहीत. अशा वेळी पुनर्विचारासाठी वेळ मागून घ्या व त्यांचे प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळतील अशा रीतीने शक्य ते फेर-बदल करून घ्या व पुन्हा त्यांच्याशी चर्चा करा. तोपर्यंत त्यांनाही ही कल्पना थोडी फार पसंत पडू लागली असेल.

एखादे वेळी तुमचे वरिष्ठही तुमच्या कल्पनेवर अधिक माहिती गोळा करण्यासाठी किंवा विचार करण्यासाठी वेळ मागतील. अशा वेळी तातडतोब निर्णय मिळविण्यासाठी आग्रही बनू नका. त्यांना उदारपणे वेळ द्या. त्याचा परिणाम तुम्हाला अनुकूल निर्णय मिळण्याकडेही होईल. या मिळालेल्या वेळात तुम्हीही तुमची कल्पना अधिक प्रभावी कशी करता येईल या दृष्टीने प्रयत्न करा.

५. प्रयत्न सोडू नका. तुमची कल्पना नेहमीच स्वीकारली जाईल अशी आशा करणे व्यर्थ आहे. परंतु एखादी कल्पना धुडकावून लावली गेली किंवा त्यावर योग्य वेळात निर्णय मिळाला नाही म्हणून निराश होण्याचे कारण नाही. तुमच्या कल्पनेवर विचार झाला यातच तुम्हाला बरेचसे यश मिळालेले असते. तुम्ही वेळोवेळी कल्पना मांडत राहाल तर तुमच्याकडे आदरानेच पाहिले जाईल. तुमच्या कल्पना तुमच्या कंपनीचे काही प्रश्न सोडवायला हातभार लावतील व तुम्हाला त्याचे योग्य ते फळ पदरात पडेलच अशी खात्री बाळगायला हरकत नाही. आणि समजा काहीच आर्थिक लाभ अथवा मानसन्मान मिळाला नाही तरी वेळोवेळी निरनिराळ्या कल्पनांवर विचार करीत राहिल्याने, त्यावर इतरांशी चर्चा करण्याची सवय वाढविल्याने, तुमच्या विचारशक्तीत, बौद्धिक पातळीत व व्यक्तिमत्त्वात निश्चितच वाढ होईल. वेलगाम दौडणाऱ्या मनाला काहीतरी विधायक विचारात गुंतवून ठेवल्याने त्याच्या स्वैरपणाला आळा बसेल हा काय कमी फायदा आहे ? प्रचंड धन किंवा दुर्मिळ मानसन्मान संपादणाऱ्या व्यक्तीपेक्षा नव्यानव्या विधायक कल्पनेत दंग असणाऱ्यांनाच मनःशांती व समाधान अधिक लाभत असेल.

---

## बड्या उद्योग समूहांचा कर्जपुरवठ्यातील वाटा उतरत चालला

२९ जानेवारी, १९७३ रोजी १४ राष्ट्रीयीकृत बँकांनी ज्या औद्योगिक कंपन्यांना कर्ज दिले होते, त्यांतल्या पहिल्या ५० क्रमांकांची नावे येथे दिली आहेत. एकूण कर्जापैकी १४.७% एवढी रक्कम ह्या ५० कंपन्यांकडून एकूण येणे होती. सर्व कर्जदारांकडून मिळून ३,४८१ कोटी रु. येणे होते, त्यांतला ह्या ५० कंपन्यांचा वाटा ५११ कोटी रु. होता. त्यातला पहिला क्रमांक बिर्ला समूहाचा होता. (७७.२६ कोटी रु.). त्या खालोखाल टाटा समूह होता. (५०.०१ कोटी रु.)

एकूण कर्ज पुरवठ्यातील ह्या ५० समूहांचा वाटा कमीकमी होत चालला आहे. १८ जुलै १९६९ रोजी तो २१.९७% होता, २५ जून १९७१ रोजी तो १७.८३% वर आला, ३० जून, १९७२ रोजी तो १५.९७% होता, आणि २९ जून, १९७३ रोजी तो १४.७% वर आला.

(पुढील कोष्टकातील आकडे लाखाचे आहेत.)

## बड्या उद्योगांना कर्जपुरवठा

| | १८-७-६९ | २५-६-७१ | ३०-६-७२ | २९-६-७३ |
|---|---|---|---|---|
| टाटा | ५९४५.१६ | ४२५६.३७ | ५४२७.११ | ५००१.१० |
| बिर्ला | ५४३०.१७ | ७४२५.६४ | ७२००.३४ | ७७२६.२७ |
| मार्टिन बर्न | २७३.५० | ३३४.०० | ४७९.३८ | १३६७.६२ |
| मफतलाल | २४२४.८६ | २३८१.४३ | २६०२.४६ | २१५२.५९ |
| बंगुर | १६५२.०३ | २१८७.१० | २११७.११ | २३६२.४७ |
| थापर | ९१२.०५ | ७२४.५३ | ९४१.४२ | १२९३.०९ |
| ए. सी. सी. | १६४.९७ | ८९.६३ | २६.७२ | १५.२१ |
| श्रीराम | ७८६.२८ | १०९७.०८ | १०७०.०३ | ११७९.०१ |
| आय सी. आय. | ६३२.७२ | १०८५.७८ | १०९७.३४ | ८०५.२० |
| सुरजमल नगरमल | ३०४.२३ | ३७७.६३ | ३१५.३१ | ४०३.७१ |
| वालचंद | १६२५.६५ | १९११.४२ | २०१९.७० | १९९९.६३ |
| जे. के. सिंघानिया | ११११.६९ | १५३८.१६ | १५१७.०७ | १८७७.६२ |
| साहू जैन | १०४५.५७ | ९३३.८० | ८५५.२३ | ६५५.७५ |
| पॅरी | ५.८३ | ३२.८५ | २९.९० | ०.६६ |
| किर्लोस्कर न्युमॅटिक | — | १८३६.२७ | १७५६.८० | १७००.६४ |
| बर्ड | ३९०.३५ | ३८६.२१ | ३५८.८२ | २८९.३४ |
| साराभाई | ९८६.४१ | २४१७.६४ | १५९१.९७ | २०९९.९९ |
| सिंधिया | — | २९.६६ | २६.७५ | २१२.१२ |
| गोयंका | ६२०.१५ | ७१८.७२ | ८८२.५८ | ८५३.८१ |
| किलिक | ५९१.२४ | २०४.२३ | ७६८.५५ | ५९१.१६ |
| मॅकनील-बॅरी-बिनी | ५४१.५१ | ८००.२४ | ५५८.६९ | ४९८.९७ |
| कस्तुरभाई लालभाई | १२४६.८८ | ११७१.७६ | १२८८.३९ | १४४५.०४ |
| महिंद्र अँड महिंद्र | ८७४.८८ | ९५१.०९ | ५६४.६९ | ११५३.९६ |
| टी. व्ही. सुं. अय्यंगार | ३७४.८४ | ६८२.६८ | ६१९.३४ | ५०४.४५ |
| बजाज | ८६८.२८ | ८३६.६९ | ५५१.२५ | ८४३.३१ |
| अँन्ड्र यूल | — | ३५.४३ | १६०.०९ | १४१.८६ |
| जार्डिन हेंडरसन | ८४.०२ | २२२.५२ | २१२.४६ | २०६.०९ |
| खटाव | ४९७.९८ | ५००.९६ | ५५८.३८ | ५३३.४९ |
| मावह्र | ७१४.५५ | १०४९.५० | ७४४.५६ | ८७६.८४ |
| मेटी | ७५२.५४ | ७९६.५० | ७४४.५६ | ८७६.८४ |
| किलाचंद | ३७५.४६ | ३३९.४९ | १०१.३१ | १९८.८७ |
| शेशशायी | ५१५.९१ | ४८०.६० | ५३२.४१ | ५२०.९८ |
| डालमिया जे. | ३५९.१६ | ३८९.७६ | २२२.४२ | ३५०.६९ |
| सिंप्सन | ५७८.४२ | ११८७.२८ | १०७६.८५ | ११०८.६८ |
| गिलंडर्स आर्थबुटनॉट | १५.४९ | २७.६९ | — | — |
| शॉ वॉलेस | २२३.९९ | २३५.८९ | ६१.८३ | १६०.१४ |
| शापुरजी पालनजी | ४९३.०६ | ३५९.७४ | २६४.२८ | ४५१.३५ |
| कामाणी | ७०१.४५ | १३८३.५५ | १८६३.६३ | १२८२.६८ |
| व्ही. रामकृष्ण | ४९०.१६ | ४४९.२० | ४७४.३८ | ३७३.५१ |
| गॅलिस | ६५.२० | २७.२१ | ३०.१४ | २९.९५ |
| नौरोजी वाडिया | १५४.८९ | १७७.४० | २२८.८९ | २४८.७८ |
| कइया | ९७३.०७ | ११७५.१६ | ११०३.७४ | ११६२.१८ |
| एस. पी. जैन | ६६१.४९ | ४६७.४३ | ५८३.८१ | ५०९.१८ |
| ए. अँड एफ. हार्वे | १४७.४८ | ९.६६ | १२.२७ | १२२.०० |
| ठाकरसी | ६१६.०८ | १७४.११ | ८२१.२८ | १०५९.४६ |
| टर्नर मॉरिसन | १५२.०० | १४७.६६ | १५२.८७ | ११३.०९ |
| त्यागराज | ४५८.११ | ६७७.६४ | ६८५.६५ | ६११.९९ |
| जयपुरिया | ४७६.२२ | ५४५.५१ | ६७२.१७ | ५६६.४७ |
| मर्गाप्पा | ३६.२६ | ४१.१२ | ५.७० | २.२१ |
| अमीन | ५४९.१४ | ६०४.९० | ७०३.४१ | ८८.७३ |
| (अ) एकूण | ३११७४.०९ | ४६४९६.६६ | ५७१०४.८६ | ५११९४.६१ |
| (ब) सर्व कर्जदारांची एकूण | १८११४०.०० | २६०६७०.०० | २९४१२०.०० | ३४८०८०.०० |
| (क) अ चे ब शी प्रमाण | २१.९७% | १७.८३% | १५.९७% | १४.७०% |

# स्मगलिंगमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला सुरूंग लागत आहे

## चोरट्या आयात-निर्यातीचे प्रचंड व्यवहार

सुमारे १२,००० कोटी रुपये किमतीचा काळा पैसा प्रचारात असून त्यापैकी ३० ते ४०% पैसा स्मगलर्सच्या हातात आहे. चोरटा व्यवहार करणारे हे स्मगलर चैनीच्या जिनसा चोरट्या मार्गे भारतात आणतात इतकेच नव्हे तर भारतात दुर्मिळ असणाऱ्या जीवनावश्यक जिनसा (तांदूळ, वनस्पती, खाद्य तेले, साखर, केरोसीन, इत्यादी) चोरट्या मार्गे निर्गत करतात. गुजरात सरकारने धान्याची कित्येक पोती, साखर आणि वनस्पती ह्यांची निर्गत वाटेत पकडली, त्याची हकीकत गुजरातचे गव्हर्नर श्री. विश्वनाथन्, ह्यांनी नुकतीच सांगितली आहे. हिंदुस्तानी चळवळीचे संस्थापक श्री. मधु मेहता ह्यांनी आपल्या एका लेखात (ऑनलुकर, आगस्ट १९७४) ह्या व्यापारावर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे. त्यांनी दिलेले बेताज बादशहाचे उदाहरण उद्बोधक आहे.

हा स्मगलर गुजरातमधला असून गुजरातच्या दक्षिणेच्या किनाऱ्यावरून तो आपला धंदा चालवितो. छाप्यात जप्त होणारा माल, द्यावे लागणारे हप्ते, हे वजा जाता त्याला दरमहा ३ ते ४ कोटी रुपयांची प्राप्ती होत असावी. मोटारी, ट्रक्स, व्हॅन्स, टॅक्सीज, इत्यादींचा २५० चा ताफा त्याच्याजवळ आहे. त्यांपैकी कित्येक विदेशी बनावटीच्या असून त्या वेगवेगळ्या लोकांच्या नावांवर आहेत. स्वित्झर्लंडमधील घड्याळांच्या एका मोठ्या प्रसिद्ध कारखान्यात त्याने परदेशातील आपल्या प्रचंड मिळकतीपैकी बरीच मोठी रक्कम गुंतविलेली आहे. दक्षिण गुजरातमधील एका गावाचा तीन-चतुर्थांश भाग त्याच्या मालकीचा आहे. आपल्या नातेवाइकांच्या आणि मित्रांच्या नावाने त्याने गुजरात, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि केरळ येथे शेते व मळे विकत घेतले आहेत. त्याच्या एका जवळच्या नातेवाइकाला एका सुप्रसिद्ध कंपनीचा संचालक करण्यात आलेले आहे. त्याच्या बोटी दुरुस्त करण्यासाठी त्याचे स्वतःचे एक बंदर आहे. सर्व बोटी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक सामग्रीने सुसज्ज आहेत. तो दुबाईला नेहमी जातो-येतो आणि तेथून तो जगभर भ्रमंती करतो. भारतात, दुबाई येथे आणि इतर ठिकाणी मिळून त्याच्या नोकरीत ५,००० लोक आहेत. सोने-चांदी बाजार, शेअरबाजार, येथे त्याला बरेच वजन आहे आणि सरकारचे करविषयक धोरणही आपल्या वजनाने बदलते अशी तो फुशारकी मारतो. वेगवेगळ्या बाजारात कारवाया करून स्मगलर्सना व्यापारी औद्योगिक जगात नेतृत्व प्राप्त होऊ लागले आहे. स्मगलर आणि त्यांचे गुंड ह्यांचा कच्छपासून गोव्यापर्यंतच्या किनाऱ्यावर वचक आहे. १९७३ साली सुमारे २५० कोटी रुपयांचा नायलॉन आणि रेयानचा माल स्मगलर्सनी चोरट्यामार्गी आयात केला, १९७४ मध्ये त्याची रक्कम ३५० कोटी रु. वर जाईल, असा त्या व्यवसायातील लोकांचा अंदाज आहे. ही नुसती कृत्रिम धाग्यांच्या कापडाची आयात; इतर शेकडो प्रकारच्या मालाची चोरटी आयात होत असते. मुंबई शहरात दररोज १ कोटी, ५० लक्ष रु. चा चोरटा माल विकला जातो. त्यापैकी, ५० लक्ष रु. काळा पैसावाले देतात; बाकीचे १ कोटी रु. सामान्य जनतेने दिलेले असतात. विदेशी मालाच्या आकर्षणाने ते भुललेले असतात, त्याचा हा परिणाम. अशा रीतीने, दररोज १ कोटी रु. अधिकृत चलन गडप होत जाते. स्मगलिंगमुळे आपल्या देशाचे दरसाल १,००० कोटी रु. चे नुकसान होते असा अंदाज आहे. स्मगलर्सची संपत्ती दुबाई आणि स्वित्झर्लंड येथील बँकांतून ठेवली जाते. गेल्या वर्षात कित्येक छोटे स्मगलर निर्माण झालेले आहेत. दुबाई आणि मुंबईसारख्या ठिकाणी ते असेंब्ली प्लँट स्थापन करतात. स्वित्झर्लंडमधील प्रमुख घड्याळ कारखानदारांची नावे छापलेल्या तबकड्या ते तयार करतात आणि भिकार जपानी व हाँगकाँगच्या घड्याळावर त्या बसवून, अस्सल स्विस घड्याळे म्हणून विकतात. चोरून आणलेली दारू अस्सल म्हणून विकली जाते, पण त्यापैकी ९०% दारूत भेसळ केलेली असते. हत्यारे आणि दारूगोळाही भारतातून आता निर्गत केला जात आहे. पश्चिम किनाऱ्यावरून ही निर्गत होते, तर भारत-नेपाळ आणि भारत-भूतान सीमेवरून मशीनगन्स, ऑटोमॅटिक पिस्तुले, रिव्हॉल्व्हर्स, ह्यांची भांग, चरस, गांजा, धान्य, वनस्पती, ह्यांच्या मोबदल्यात आयात होत आहे. ही शस्त्रसामग्री चीनमध्ये केलेली असते. आणि दरोडेखोर, स्मगलर (त्यांच्या गुंडांसाठी) आणि काही राजकीय दंगेखोर ही त्यांची गिऱ्हाइके होत. बनारस, अझमगड, राइ बरेली, वापी, पणजी, ह्यातून त्यांची देवघेव होते. काही स्मगलर्सनी आपले खाजगी छोटे विमानतळ (एअर स्ट्रिप) तयार केले आहेत. तेथून चोरटा माल नेला आणि आणला जातो. त्या विमानतळाचा उपयोग काही बडे व्यापारी-कारखानदार सोने, हिरे, दागिने, दुर्मिळ पुतळे, ह्यांच्या आयातीसाठी करतात काही नव्या उद्योगसमूहांना स्मगलर्सच भांडवल पुरवीत असतात. आणि त्यात निर्णायक अधिकार प्राप्त करून घेतात. काही स्वामींचीही स्मगलर्सशी हातमिळवणी असते. चित्रपट निर्माते आणि टोलेजंग इमारतींचे कंत्राटदार ह्यांनाही स्मगलर्सचा मोठा पाठिंबा असतो. मुंबई शहरात केवळ फुटपाथवरच नव्हे तर १०० मोठ्या दुकानांतून चोरटा आयात माल विकला जातो. "ज्यांनी कस्टम ड्यूटी आणि दंड भरून माल आणला आहे, त्यांचेकडून आम्ही हा माल विकत घेतला आहे" असे ते दुकानदार सांगतात आणि कस्टम्सची काही सर्टिफिकेटेही दाखवतात. ही दुसऱ्यांची सर्टिफिकेटे त्यांनी विकत घेतलेली असतात. स्मगलर्सच्या दादांना कायदा काहीच करीत नाही, त्यांच्या हस्तकांना ते सापडलेच तर दंड होतो. क्वचित कधी तुरुंगवासाची शिक्षा होते. डिफेन्स ऑफ इंडिया रूल्स आणि मेंटेनन्स

ऑफ इंटर्नल सिक्युरिटी ॲक्ट ह्यांचा वापर करून सरकारने ह्या धंद्यावर आघात केला पाहिजे. स्मगलिंगला आवरण्याचे काम काही काळ तरी भारतीय नौदलाकडे सोपवावे. जप्त केलेला माल सहकारी सोसायट्यांमार्फत नागरिकांना विकला जाऊ नये, तो नष्ट करावा किंवा स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनमार्फत पुनः निर्गत केला जावा. आपल्या अर्थव्यवस्थेला चोरट्या व्यापाराने सुरुंग लावला जात आहे. अशा वेळी सामान्य जनतेनेही जागे होऊन परदेशी मालाविषयीचे आकर्षण कमी केले पाहिजे. तरच सरकारी प्रयत्नांना पुरेसे यश मिळू शकेल.

---

### स्मगलिंगच्या पैशांची आंतरराष्ट्रीय देवघेव

हुंडी पद्धत ही पूर्वापारपासून चालत आलेली देवघेवीची पद्धत आहे. पेढ्यांचे मोठे जाळे असे आणि एका पेढीने दुसऱ्या पेढीवर काढलेली हुंडी म्हणजे पैसे देण्यास सांगितलेली सूचना मानली जात असे.

आज स्मगलर्स एकमेकांचे देणे ह्याच पद्धतीने भागवीत असतात. एखाद्याला परदेशात काही रक्कम हवी असेल, तर तो भारतातील विशिष्ट दलालाकडे जातो; त्या दलालाला भारतीय चलनात रक्कम द्यावयाची म्हणजे तो एका कागदावर गुप्त भाषेत काहीतरी लिहून देतो; हा कागद परदेशातील ठराविक दलालाला दाखविला म्हणजे तो तेथील चलनात रक्कम देतो. अशा रीतीने कोट्यवधी रुपयांची आंतरराष्ट्रीय देवघेव होते. परदेशात पैसे कमावणारे भारतीयही तेथे तेथील चलनाच्या स्वरूपात पैसे देतात आणि त्याच्या मोबदल्यात भारतीय चलन मिळवितात. रिझर्व्ह बँक ज्या दराने ही देवघेव करते त्याच्या दुप्पट दराने त्यांना हा व्यवहार करता येतो. अशा रीतीने स्मगलर्सना परदेशी चलन उपलब्ध होते आणि त्या चलनाने परदेशी माल विकत घेता येऊन भारतात तो आणता येतो.

स्मगलर्सचा पैसा मुख्यतः स्विस बँकांतून ठेवला जातो; कारण त्या बँका ठेवीबाबत पूर्ण गुप्तता राखतात; चौकशा करीत नाहीत. परदेशी प्रवास करायला ज्यांना जावयाचे आहे, अशांना परदेशी हुंडणावळ भरपूर प्रमाणात मिळू शकते, त्याचे हेच रहस्य आहे. अधिकृत रीत्या फारच थोडी रक्कम भारताबाहेर नेता येते, पण काळ्या बाजारात वाटेल तेवढे परदेशी चलन विकत मिळते. बहुसंख्य भारतीय प्रवासी त्याचा फायदा घेतात; ह्यात गुप्त काहीच नाही.

---

### इन्कमटॅक्सच्या जाळ्यात न आलेले व्यावसायिक

मद्रासमधील २,७४० वकिलांपैकी फक्त ३७० वकील इन्कम टॅक्सकडे हिशेब देत आहेत; २,२३८ डॉक्टरांपैकी १,०९९ डॉक्टरांना हिशेब द्यावे लागत आहेत. पण, ८७६ चार्टर्ड अकौंटंट्सपैकी ७०४ जण इन्कम टॅक्सच्या जाळ्यात नाहीत. वास्तविक, हे लोक कंपन्यांची व बड्या व्यापाऱ्यांची इन्कम टॅक्सची कामे करीत असतात आणि ते खूप पैसे कमवितात.

★ ★ ★

धनवर्धिनी
परंपरेतील
४ नवीन योजना

कर्जहमी ठेव योजना
ठेव परतीचे वेळी तितकेच कर्ज
मिळण्याची सुरवातीलाच हमी

विशेष सेव्हिंग्ज खाते
८.७५ टक्के व्याज, पैसे काढताना
९१ दिवसाची पूर्व सूचना.

मुदतीचे सेव्हिंग्ज खाते
७.२५ टक्के व्याज
मुदत ३ ते ६ वर्षे

मासिक व्याज ठेव योजना
किमान १००० रु. (नव्या स्वरूपात)
कमीत कमी १ वर्ष मुदत.

युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन

एका राज्यात शाखा असलेल्या बँकांमधील
भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कार्यालय: युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा १.

★ ★ ★

# लाइपजिक आंतरराष्ट्रीय व्यापारी मेळावा

## ५० देशांच्या ६,००० औद्योगिक व व्यापारी पेढ्या सामील

जर्मन लोकशाही प्रजासत्ताकाच्या लाइपजिक शहरात ता. १ ते ८ सप्टेंबरपर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापारी मेळावा व प्रदर्शन भरत आहे. या सत्रात भाग घेणाऱ्या देशांची, तसेच यामध्ये मांडण्यात येणार असलेल्या विविध वस्तूंची व अन्य मालाची माहिती करून देण्यासाठी राजधानी बर्लिन येथे बोलावण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये, लाइपजिक आंतरराष्ट्रीय व्यापारी मेळाव्याचे महानियंत्रक फ्रारडिश वोनसेक म्हणाले, लाइपजिक आंतरराष्ट्रीय व्यापारी मेळाव्याच्या शिशिरऋतूच्या या सत्रात ५० देशांच्या ६,००० औद्योगिक व व्यापारी पेढ्या भाग घेत आहेत. ८० देशांचे व्यापारी व त्यांचे प्रतिनिधी खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्यासाठी आले आहेत.

### ३ लक्ष ७० हजार चौरस मीटरची प्रदर्शनासाठी जागा

४४ मोठे खंड किंवा विभाग, मंडप, प्रदर्शनासाठी १६ इमारती व बाकीची खुली मैदाने मिळून २ लक्ष, ७० हजार चौरस मीटरपेक्षा जास्त विस्तृत अशा या प्रदर्शनाच्या जागेत जगातील अनेक देशांच्या विविध बनावटीच्या वस्तू सादर केल्या आहेत. वापरावयाच्या चीजवस्तूंच्या २४ आणि औद्योगिक कलाकृतींच्या ८ अशा एकूण ३२ शाखांमध्ये प्रस्तुत लाइपजिक आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनाचे विभाजन झालेले आहे. रसायनशास्त्राच्या विभागात २१ देश, कापड बनविण्याच्या यंत्रांच्या शाखेत १९ देश, रसायने तयार करण्याच्या यंत्रांच्या शाखेत १६ देश, रस्ता-वाहतुकीच्या शाखेत तसेच आरोग्यविषयक साधनांच्या शाखांत प्रत्येकी १४ देश आणि प्लॅस्टिक व त्यासाठी लागणाऱ्या यंत्र-सामग्रीच्या शाखेत १३ देश भाग घेत आहेत.

### भारताने कायम राखलेले आघाडीचे स्थान

औद्योगिक दृष्ट्या विकसित युरोपीय व समुद्रापलीकडील २५ देशांचे १,५०० पेक्षा जास्त प्रदर्शक या व्यापार मेळाव्यात भाग घेत आहेत. विकसनशील देशात भारत, बांगला- देश, सिरिया, इजिप्त, लेबॅनॉन, ब्राझील, मोरोक्को, इराण, मेक्सिको, इक्वेडोर, व अर्जेन्टीना प्रमुख आहेत. या विकसनशील देशांबरोबरचा जी. डी. आर. चा १९७३ साली अगोदरच्या वर्षापेक्षा ६२ टक्क्यांनी जास्त व्यापार झालेला आहे आणि या व्यापार-वृद्धीमध्ये लाइपजिक आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे. समुद्रापलीकडील विकसनशील देशांमध्ये भारताने आपले आघाडीचे स्थान कायम राखले आहे.

### अणुशक्तीचा शांततामय उपयोग प्रदर्शन

या खेपेला लाइपजिक आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याचे खास आकर्षण आहे अणुशक्तीच्या शांततामय उपयोगासाठी परस्पर आर्थिक सहाय्यक समितीच्या समाजवादी सभासद देशांनी विकास केलेल्या असंख्य प्रक्रिया व त्यासाठी लागणारी साधने हा विभाग इंटर ॲटम इन्स्ट्रुमेंट स्पेशल एक्झिबिशन या नावाने ओळखला जाईल आणि त्यात सोविएत संघ, पोलंड, चेकोस्लोवाकिया, हंगेरी, बल्गेरिया व जर्मन लोकशाही प्रजासत्ताक यांनी अणुशक्तीच्या शांततामय उपयोगासाठी जे नवीन संशोधन केले आहे व साधने शोधून काढली आहेत, त्यांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. अणुशक्तीच्या शांततामय उपयोगासाठी आग्रह धरणाऱ्या भारताच्या दृष्टीने हा विभाग विशेष मार्गदर्शक ठरेल.

नेदरलण्ड व फिलिपाईन्स यांनी त्यांनी विकास केलेल्या नवीन बीजाणू सूक्ष्मदर्शक यंत्राचे (इलेक्ट्रोमायक्रोस्कोप) प्रदर्शन मांडले आहे.

### जी. डी. आर.च्या स्थापनेचे रजत जयंती वर्ष

लाइपजिक आंतरराष्ट्रीय व्यापारी मेळाव्यात जी.डी. आर. चे रासायनिक बनावटीचे जिन्नस, रसायनाचा कारखाना उभारण्यास लागणारी यंत्रे, कापडासाठी लागणारी यंत्रे, रस्त्यासाठी लागणारी वाहने, मुद्रणयंत्रे, आरोग्याची साधने आणि तयार मालाचे विविध जातीचे नमुने पहावयास मिळतील. हे जी. डी. आर.च्या स्थापनेचे रजत-जयंती वर्ष असल्याकारणाने त्याच्या प्रगतीचा व पुरुषार्थाचा आलेख सादर करणाऱ्या आणि त्याच्या गौरवात व कीर्तीत भर घालणाऱ्या अनेक नवीन जिनसा या प्रदर्शनात मांडण्यात येत आहेत. जी. डी. आर.च्या वैद्यकीय उद्योगधंद्याने बनवलेली हटकून गुणकारी औषधे, शिक्षणक्षेत्रासाठी विकसित केलेली नवीन साहाय्यक साधने, शाळांसाठी खास तयार करण्यात आलेले रंगीत तक्ते व खेळणी, ही या प्रदर्शनाचे विशिष्ट प्रकारचे आकर्षण ठरणार आहेत.

---

**सोनाली बँक ऑफ बांगला देश** — बांगला देशच्या या मध्यवर्ती बँकेने कलकत्ता येथे आपली शाखा १६ ऑगस्ट रोजी सुरू केली. स्टेट बँक ऑफ इंडियाची ढाका येथील शाखा लवकरच सुरू होईल.

**महाराष्ट्र बँकेचे विद्युतीकरणासाठी कर्ज** — सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागात वीज खेळविण्यासाठी महाराष्ट्र बँकेने ३०३.९४ लक्ष रुपये कर्ज देण्याचे ठरविले आहे. त्यांपैकी ५० लक्ष रु. नुकतेच देण्यात आले. या योजनेनुसार सातारा जिल्ह्यातील २९६ नव्या खेड्यांना वीज येईल आणि १२,००० पंपांना विजेचा पुरवठा होईल.

**अंधळ्यांसाठी चहाचा पेला**—अंधळे जेव्हा पेल्यात चहा ओततात, तेव्हा तो भरून वाहू लागण्याची शक्यता असते. एका अमेरिकन शास्त्रज्ञाने योजलेला इलेक्ट्रॉनिक पेला भरत येताक्षणीच मंदसा गजर करतो.

“ नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. ”

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**



BANK TO BANK...

## THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth**

**BELGAUM**

Invest in our “ Family Benefit Deposit Scheme ” and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE

AND WE REALLY SERVE.


S. Y. KAMAT,

*General Manager.*



**IMPORT SUBSTITUTE**

**GADRE KEYS**



ALL TYPES AS PER SPECIFICATION


**GADRE BROTHERS** MADHAVNAGAR

PHONE NO 2318 GRAM : “SEWA”



**Swastik FOAM**

cosy sitting pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.

## जागतिक लोकसंख्या परिषद

जागतिक लोकसंख्या परिषदेस १९ ऑगस्ट रोजी बुखारेस्ट येथे प्रारंभ झाला, त्याला १३५ देशांच्या सरकारांचे ५,००० प्रतिनिधी उपस्थित होते. दोन आठवडे ही परिषद चर्चा करीत होती, तेवढ्या अवधीत लोकसंख्येत ३० लक्षांची भर पडली! वाढती लोकसंख्या आणि वाढता अन्नतुटवडा, ह्यांचा मेळ घालणे हा ह्या परिषदेचा मुख्य उद्देश होता. श्रीमंत देशांनी गरीब देशांकडे मदतीचा ओघ वाढवावा असा विकसनशील देशांचा आग्रह, तर लोकसंख्येच्या नियंत्रणाची लक्ष्ये ठरवून टाकली पाहिजेत असा श्रीमंत देशांचा आग्रह, तर ब्राझिलसारख्या देशांचा लोकसंख्या वाढीचा आग्रह, तर पेट्रोल-तेल-उत्पादक देशांनी जास्त पैसा पुरवावा, असा युनायटेड नेशन्सच्या लोकसंख्या विभाग प्रमुखाचा आग्रह.

आज फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीत जननाचे प्रमाण इतर सर्व देशांपेक्षा कमी, म्हणजे दर हजारी फक्त १२·८ आहे, तर स्वित्झर्लंडमध्ये ते सर्वात जास्त म्हणजे ५२·३ आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने चीन (७८·७ कोटी), भारत (५५ कोटी), रशिया (२४·५ कोटी), अमेरिका (२०·७ कोटी) आणि इंडोनेशिया (१२·५ कोटी) हे सर्वात मोठे देश आहेत. जगातील एकूण लोकसंख्येपैकी निम्मे लोक (२१० कोटी) आशियात राहातात. युरोपात (रशिया वगळून) ४७ कोटी, आफ्रिकेत ३५ कोटी, उत्तर अमेरिकेत ३३ कोटी, दक्षिण अमेरिकेत २० कोटी आणि ऑस्ट्रेलियात २ कोटी लोक राहतात. उपनगरांची लोकसंख्या लक्षात न घेता, शांघाई हे जगातील सर्वात मोठे शहर ठरते. त्याची लोकसंख्या १,०८,२०,००० आहे. त्या खालोखाल टोकियो (८८,४१,०००) न्यूयॉर्क (७८,९५,०००), पेकिंग (७५,००,०००) आणि मॉस्को (७०,५०,०००) ह्या शहरांचा अनुक्रम लागतो.

अर्जेंटिना, भारत, इजिप्त, एथिओपिया, इटली, लेसोथो, लायबेरिया आणि युगोस्लाव्हिया ह्या देशांनी जागतिक लोकसंख्या परिषदेला स्पष्ट सांगितले आहे की, जननसंख्येचे नियंत्रण करण्यापेक्षा आर्थिक विकासानेच लोकसंख्येचे प्रश्न सोडविण्यात आले पाहिजेत; योजनेच्या मसुद्यात ह्या देशांनी अनेक उपसूचना मांडून 'लोकसंख्येच्या स्फोटा'चे उल्लेख गाळायला लावले आहेत. ह्या आठ देशांना तिसऱ्या जगाचा म्हणजे आशिया–आफ्रिका खंडांतील अविकसित देशांचा आणि कम्युनिस्ट देशांचा पाठिंबा आहे.

ह्या परिषदेच्या वर्किंगग्रुपने १० मूलग्राही तत्त्वे मान्य केली आहेत, ती खालीलप्रमाणे :—

लोकसंख्येच्या प्रश्नाबाबत राष्ट्रीय सार्वभौमत्व.

जीवनाची पातळी आणि दर्जा ह्यांत सुधारणा.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अभावी विकास अशक्य.

विकास आणि लोकसंख्या ह्यांचे परस्परावलंबन.

मानवी जीवांबद्दल आदरभाव (व्हॅटिकनच्या सूचनेवरून)

स्त्रियांची पुरुषांशी समानता.

लोकसंख्येच्या संबंधात देशादेशांतील फरकास मान्यता.

साधनसामग्रीची योग्य वाटणी.

रचनात्मक, सामाजिक आणि आर्थिक सुधारणांची आवश्यकता.

योजनेच्या मसुद्याची मूळ शब्दयोजना मूळ आराखड्याच्या मानाने खूपच सौम्य करण्यात आली आहे, त्यामुळे लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्यापेक्षा आर्थिक विकासाच्या गरजेवर भर देण्यात आला आहे.

---

## मोटारी आणि ट्रॅक्टर ह्यांचेवरील नियंत्रणांचा फेरविचार!

मध्यवर्ती सरकारमधील काही महत्त्वाच्या खात्यांचे मंत्री मोटारी, ट्रॅक्टर्स, इत्यादींच्या उत्पादनावरील आणि वाटपावरील नियंत्रणे रद्द करण्याची कल्पना हिरिरीने पुढे मांडीत आहेत. शेतकी खात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् आणि हेवी इंडस्ट्रिजचे मंत्री श्री. पै ह्यांच्या मते प्रचलित नियंत्रणे रद्द केली तर (१) शासनावरील निष्कारण ताण कमी होईल, (२) अर्थव्यवस्थेतून गेलेला समतोल पुनः परत येईल, (३) ह्या जिनसांच्या संबंधातील काळा बाजार नष्ट होईल, (४) आज मध्यस्थ, व्यापारी आणि दलाल जो भरमसाट नफा कमवितात तो कारखानदारांकडे आणि सरकारी तिजोरीकडे वर्ग होईल, आणि (५) उत्पादक कारखानदारांना उत्पादनवाढीस आणि कारखाने वाढविण्यास प्रोत्साहन मिळेल. ह्याउलट मत असणारांचा युक्तिवाद असा की, सत्तारूढ पक्षाने पत्करलेल्या समाजवादी धोरणाशी असे करणे विसंगत होईल. गुंतविण्याजोगा जो थोडासा पैसा आहे तो अशा श्रीमंती जिनसांच्या उत्पादनाकडे वाहू लागेल. ज्यांनी कित्येक वर्षे आपली नावे नोंदवून अनामत रकमा भरल्या आहेत त्यांना आता बाजारभावाने मोटारी आणि ट्रॅक्टर घ्यायला लावणे नीतीला धरून होणार नाही; राजकीय दृष्ट्या असमर्थनीय ठरेल. मोटारगाड्यांसाठी नोंदलेल्या नावापायी सरकारकडे सुमारे १६ कोटी रु. जमा आहेत; ट्रॅक्टर्ससाठीही तेवढीच रक्कम जमा आहे. ह्या लोकांनी रजिस्ट्रेशनसाठी पैसे देण्याऐवजी बँकांत, शेअर्समध्ये किंवा मालमत्ता खरेदीत पैसे गुंतविले असते तर त्यांना सध्याच्या वार्षिक ५% व्याजापेक्षा कितीतरी जास्त नफा मिळाला असता. ह्या मुद्याला नियंत्रणे उठविण्याची मागणी करणारांचे उत्तर असे की, मोटारी आणि ट्रॅक्टर घेणारे श्रीमंत लोक आहेत, त्यांना सोसावे लागणारे नुकसान मर्यादित आहे; त्यामानाने अर्थव्यवस्थेला होणारा फायदा मोठा आहे. जीवनावश्यक जिनसांचे उत्पादन आणि वाटप ह्यांवरील नियंत्रणे कायम ठेवण्याबाबत कुणाचेच मतभेद नाहीत.

---

## महाराष्ट्रातील रेल्वेवाहतुकीच्या योजनांवर आर्थिक अरिष्टाचे परिणाम

आर्थिक अरिष्टामुळे कित्येक रेल्वेयोजना पुढे ढकलण्यात आल्या आहेत किंवा त्यांची गती मंदावण्यात आली आहे. घाटातील रेल्वेवाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी मुंबईपासून ईशान्येकडे आणि आग्नेयीकडे जाणाऱ्या रेल्वेमार्गावरील रूळ वाढविण्याची योजना स्थगित करण्यात आली आहे. ट्रॉम्बे रिफायनरीजपासून पुण्यापर्यंत तेलाचा नळ घालण्याची कल्पना सोडून देण्यात आली आहे. घाटातून रेल्वेमार्गाने होणाऱ्या मालवाहतुकीपैकी ३०% वाहतूक तेल आणि तेलजन्य पदार्थांची असे; तेलाच्या तुटवड्यामुळे ती कमी झाली आहे. पश्चिम आणि मध्य रेल्वे ह्यांचे रूळ जोडण्यासाठी आखलेली दिवा-वसई रोड रेल्वेलाइन आता लवकर पुरी होणार नाही. वाडीबंदर गुड्स डेपोवरील ताण कमी करण्यासाठी आणि ठाणे-बेलापूर औद्योगिक विभागाच्या गरजा भागविण्यासाठी भांडुप येथे डेपो बांधण्यात येणार होता, तोही आता केव्हा होईल, कोणास ठाऊक. कोकण रेल्वेचे कामही मंदावले जाईल.

---

## फिलिपाइन्सशी व्यापारी संबंध वाढविण्यास वाव

फिलिपाइन्सची बेटे आपले व्यापारी संबंध नव्याने घडविण्याचा विचार करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या भौगोलिक स्थानामुळे आणि राजकीय संबंधामुळे त्या देशाची व्यापारी सोयरीक आतापर्यंत मुख्यत: अमेरिका आणि जपान ह्या देशांशी झाली. सामान्यपणे फिलिपाइन्सचे सरकार युरोपीय पाश्चात्त्य देशांच्या कलाने चालणारे म्हणून माहीत आहे. परंतु अलीकडे तेथील सरकारने आपली अर्थव्यवस्था स्वतंत्र पायावर उभारण्याचे प्रयत्न चालविले आहेत. ह्या नव्या धोरणात भारताला चांगला वाव मिळण्यासारखा आहे. फिलिपाइन्स देशाच्या विकासाच्या योजना आखण्यात येत असून ह्या कामात भारताकडून मदत मिळण्याची शक्यता तेथील सरकारला वाटू लागली आहे. अलीकडेच वीजवहन करणारा पोलादाचा एक मोठा मनोरा उभारण्याच्या कामी टाटा कंपनीचे साह्य घेण्यात आले आहे. टाटा कंपनीने मिळविलेल्या ह्या कंत्राटाची ९० लाख डॉलर इतकी किंमत आहे. त्याचप्रमाणे भारताकडून ३० आगगाडीचे प्रवासी डबे घेण्याचेही तेथील रेल्वे अधिकाऱ्यांनी ठरविले आहे. उभयता देशांमधील व्यापारी सहकार्यास किती वाव आहे त्याची ही दोन ठळक उदाहरणे म्हणून सांगता येतील. २०० किलोमीटर लांबीचा रेल्वेमार्ग बांधण्याचे एक कामही भारताला सहज मिळण्यासारखे आहे. भारताच्या रेल्वेवाहतुकीच्या तांत्रिक ज्ञानाबद्दल व त्यासाठी लागणाऱ्या साधनांबद्दल फिलिपाइन्समध्ये बरेच औत्सुक्य दिसून येते. १९७१ मध्ये एका वादळात तेथील ६०० किलोमीटर लांबीचा रेल्वेमार्ग फार उखडून गेला होता. त्याची दुरुस्ती करून तो पुन्हा चालू करण्याचे काम दोघा हिंदी एंजिनिअर्सच्या सल्ल्याने करण्यात आले.

## परदेशी हुंडणावळीची चिंताजनक परिस्थिती

जून, १९७४ अखेर परदेशी हुंडणावळीचा रिझर्व्ह ११२६ कोटी रु. दिसला, म्हणजे एका वर्षापूर्वीच्या मानाने तो २४३ कोटी रु. नी अधिक होता, असे चित्र निर्माण झाले. भारताने जागतिक नाणे निधीमधून ३६० कोटी रु. काढले, त्यामुळे जून अखेरचा आकडा फुगला अशी वास्तविक परिस्थिती आहे. ११२६ कोटी रु. मधून ३६० कोटी रु. वजा केले म्हणजे ७६६ कोटी रु. उरतात; १९७१–७२ नंतर आपली गंगाजळी एवढी खाली कधीच गेली नव्हती. तेलाच्या आयातीची जादा रक्कम अद्याप मोठ्या प्रमाणावर देण्यास प्रारंभ झालेला नाही, ही गोष्टही लक्षात ठेवण्यास हवी. १९७४-७५ मध्ये ३० ते ४० लक्ष टन अन्नधान्य आयात करावे लागेल, त्यासाठी सुमारे ४०० कोटी रु. परदेशांना द्यावे लागतील. तेलाच्या आयातीला १,२०० कोटी रु. आणि खते वगैरेच्या आयातीला ६०० कोटी रु. लागतील, ते वेगळेच. मदतीच्या स्वरूपात परदेशी हुंडणावळीच्या गंगाजळीत ५२० कोटी रु. ची भर पडेल, म्हणजे भरणा कमी पण काढून घेणे जास्त असे होणार आहे. ह्या परिस्थितीची तीव्रता थोडी कमी करणाऱ्या काही घटना असल्या तरी एकूण चित्र अत्यंत असमाधानकारक, चिंताजनक आहे.

---

## सेवानिवृत्त आय. सी. एस. नोकरांचे पेन्शन

भारतात ब्रिटिश राजवट असताना राज्यकारभार चालविण्यासाठी आय. सी. एस. अधिकाऱ्यांची एक चौकटच तयार करण्यात आली होती. तिला पोलादी चौकट असे म्हणण्याचा प्रघातही रूढ झाला होता. ह्या अधिकाऱ्यांपैकी काहींनी आपला सेवानिवृत्तीचा मेहनताना पौंडांच्या चलनात मिळावा म्हणून मागणी केली होती. परंतु भारताच्या सुप्रीम कोर्टाने त्यांचा दावा नामंजूर केला आहे. ह्या अधिकाऱ्यांना काही खास सवलतीही स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी चालू होत्या. त्याही ४ वर्षांपूर्वी घटना बदलून काढून घेण्यात आल्या आहेत. चलनवृद्धीमुळे आपणास मिळणाऱ्या पेन्शनची खरी किंमत घटली आहे असे त्यांचे म्हणणे होते. पण त्यांना मुळातच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मानाने अधिक प्रमाणात निवृत्तिवेतन देण्यात आलेले आहे.

---

## काळा पैसा बाहेर काढण्यासाठी उपाय

काँग्रेस पक्षातील एक खासदार श्री. शशिभूषण ह्यांनी काळा पैसा बाहेर काढण्यासंबंधी एक उपाय सुचविला आहे. ज्या लोकांजवळ काळा पैसा आहे त्यांना तो सरकारजवळ ठेव म्हणून ठेवण्याची परवानगी देण्यात यावी. १० वर्षांनंतर त्याना तो परत देण्यात येईल अशी हमी सरकारने द्यावी. ह्या मुदतीनंतर तो अर्थातच पांढरा म्हणजे निष्कलंक पैसा गणला जावा. ह्या दहा वर्षांच्या मुदतीत काळ्या पैशाच्या ठेवीवर व्याज मात्र देण्यात येऊ नये.

**चीनची लोकसंख्या** —बुखारेस्ट ( रुमानिआ ) येथे जागतिक लोकसंख्या परिषद भरविण्यात आली होती. त्या वेळी चीनच्या प्रतिनिधीने चीनच्या लोकसंख्येचा अधिकृत आकडा सांगितला. एरव्ही चीनची लोकसंख्या म्हणजे बेभरवंशाचा अंदाज असे. चिनी प्रतिनिधीने दिलेल्या माहितीप्रमाणे त्या देशाची लोकसंख्या आता ८० कोटींच्या घरात आहे. १९४९ साली चीन कम्युनिस्ट पक्षाच्या अधिसत्तेखाली आला. त्या वेळी त्याची लोकसंख्या ५० कोटी होती. म्हणजे गेल्या २५ वर्षांत लोकसंख्या ६० टक्क्यांनी वाढली.

**रशिआत किमती स्थिर**—भारत-रशिआ कराराचा तिसरा वाढदिवस साजरा करण्यासाठी भारतामधून एक प्रतिनिधिमंडळ मॉस्कोला गेले होते. त्याचे पुढारी श्री. गोदीवाला ह्यांनी अशी माहिती दिली की गेल्या दोन वर्षांत रशिआचे राष्ट्रीय उत्पन्न वाढले असून तेथील किमती गेली बरीच वर्षे स्थिर आहेत.

**दरोडेखोर सिनेस्टार बनणार**—चंबळखोऱ्यातील कुप्रसिद्ध दरोडेखोर माधवसिंग आणि मोहनसिंग हे दोघे ' चंबळ के शेर ' ह्या बोलपटात काम करणार आहेत. रत्नेश सयाणी हे प्रस्तुत बोलपटाचे निर्माते आहेत. दोघेही दरोडेखोर सध्या मध्यभारतात खास निर्माण केलेल्या उघड्या जागेच्या तुरुंगात कैदी आहेत. राज्य सरकारने दरोडेखोरांचे हृदयपरिवर्तन दर्शविणारी बोलपटाची कथा मंजूर केल्यानंतरच दरोडेखोरांना त्यात भाग घेण्यास परवानगी दिली.

**मोटारगाडी खरेदीसाठी कर्ज नाही** — मोटारगाडी खरेदीसाठी आपल्या नोकरांना कर्ज देणे मध्यवर्ती सरकारने बंद केले आहे. त्यामुळे सरकारचे दरसाल २ कोटी रु. वाचतील. स्कूटर, मोटारसायकल आणि सायकल ह्यांच्या खरेदीसाठी मात्र पूर्वीप्रमाणेच कर्जे मिळतील.

**केरोसीन मागणीपेक्षा १५ ते २० % कमी** — १९७४-७५ च्या उरलेल्या काळात केरोसीन मागणीपेक्षा १५ ते २० % कमी एवढे उपलब्ध होईल.

**एअर इंडिया वैमानिकांचा संप** — ह्या संपामुळे पहिल्या २८ दिवसात एअर इंडियाचे ५ कोटी रु. चे नुकसान झाले, ते मुख्यतः परदेशी हुंडणावळीच्या कमाईत.

**कुटुंबनियोजनासाठी सिमेंटची लालूच**— हरयाणामध्ये कुटुंबनियोजनाच्या प्रसारासाठी सिमेंट देऊ करण्यात येत आहे. शस्त्रक्रिया करून घेणाऱ्याला नियंत्रित दराने ५ पोती सिमेंट मिळणार आहे. शस्त्रक्रियेबद्दल पुरुषाला ५५ रु. आणि स्त्रीला ६० रु. मिळणार ते वेगळेच.

**एक्सप्रेस डिलिव्हरीऐवजी रेकॉर्डेड डिलिव्हरी**— पोस्टाची एक्सप्रेस डिलिव्हरी पद्धत १ नोव्हेंबरपासून बंद करून त्या जागी रेकॉर्डेड डिलिव्हरी सर्व्हिस सुरू होईल. नेहमीच्या हशिलाखेरीज त्याला ६५ पैशांचे जादा तिकीट लावावे लागेल. पाठविण्याची आणि पोचल्याची पावती मिळेल.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३०३३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

"भिडे" ओव्हर पिक

पॉवर लूम्स ५६," ६०" व ६४"



भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि;

—सांगली—

फोन नं. २०६१.

रघुनाथराव भिडे

कार्यकारी संचालक

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सुटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.



**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

काऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१९, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)